INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# "पुरातत्व आणि लोकशिक्षण : एक अभ्यास"

# (Archaeology and Public Education: A Study)

**प्रा. डॉ. आर. ए. चव्हाण**

इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link ::https://doi-ds.org/doilink/03.2025-12956573/IRJHIS2401015/January 2024**

**प्रस्तावना :**

मानवी संस्कृतीच्या अतिप्राचीन इतिहास लेखन करण्यासाठी आपणास पुरातत्वविद्येची मदत घ्यावी लागते. पुरातत्वविद्येचा अर्थ मानवी संस्कृतीचा विकास व विकासाचा इतिहास असाच करावा लागतो. "भूतकालीन मानवी जीवनाची घडण जाणण्यासाठी केलेला आवशेषांचा पध्दतशीर व शास्त्रीय अभ्यास म्हणजे पुरातत्व होय." ग्रॅहम क्लार्कने आपल्या Archaeology of Society या ग्रंथात म्हटले आहे. इ.स. १७८४ मध्ये भारतात कोलकाता येथे Royal Asiatic Society of Bengal स्थापना झाली.[१]

इ.स. १८८१ मध्ये भारतात पुराणवस्तू संशोधन खात्याची स्थापना झाली. अलेक्झांडर कॅनिगहॅम हा अनेक वर्षे त्या खात्याचा प्रमुख होता. इ.स. १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन व्हाईसरॉय झाल्यावर त्याने पुराणवस्तु संशोधनाला शास्त्रीय रूप दिले. पुरातत्वाविद्येची सुरूवात जरी काही व्यक्तींच्या छंदातून झाली असली तरी त्या छंदाला व्यापक स्वरूप नव्हते. व्यक्तिगत नाद एवढेच मर्यादित स्वरूप त्याला होते. यानंतरच्या काळात मात्र या छंदाला संघटीत स्वरूप आले व त्यामुळे पुरातत्वविद्येला व तिच्यातर्फे केल्या जाणाऱ्या संशोधनाला व्यापक स्वरूप येऊन जनमानसात तिच्याबद्दल मोठे कुतुहल निर्माण झाले. आज पुरातत्वीय संशोधनाला जी व्यापक जनजिज्ञासा लाभली आहे, त्यामुळे हे संशोधन केवळ मुठभर तज्ज्ञांच्या करता राहणे इष्ट नसून तिचा लोकशिक्षणाकरिता या संशोधनाचे शास्त्रीय स्वरूप कायम ठेवूनही कसा उपयोग करता येईल याबद्दल अनेक देशांत विचार चालू आहे. भारतातही हौशी प्रवासी, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, संशोधक व तज्ज्ञ यांच्याकरिता पुरातत्वीय संशोधनाचा व अवशेषज्ञांचा उपयोग अलिकडे जाणीवपूर्वक करण्यात येऊ लागला आहे. म्हणून पुरातत्वविद्येचे लोकशिक्षण आवश्यक आहे.

**पुरातत्व आणि सामान्यजन :**

पुरातत्व ही संज्ञा अलीकडे रूढ झालेली असल्याने, तिच्या पुरातत्व संज्ञेला इंग्रजी भाषेतील समानार्थक शब्द 'आर्किऑलॉजी' Archaeology हा आहे. पुरातत्वविद्या गेल्या पन्नास वर्षात जास्तीतजास्त इतर शास्त्रांची, त्याच्या तंत्रांची व साधनाची मदत घेऊ लागल्याने हा विषय शास्त्रात मोडतो, म्हणजे केवळ तंत्रज्ञ व शास्त्रज्ञांलाच कळेल अशा भाषेत व स्वरूपात मांडली पाहिजे, असे हे विद्वान म्हणतात. याउलट शास्त्रीय तंत्रांचा अवलंब केला वा इतर शास्त्राची मदत घेतली म्हणून केवळ पुरातत्वाविद्याशास्त्रात मोडते असे नसून ती मानवी संस्कृतीच्या अभ्यासाकरिता असतानासुध्दा सर्वसामान्य जनतेला कळेल, अशा भाषेत संशोधनाची मांडणी करून लोकशिक्षणाचे ध्येय साधावे, असे मत मांडले जाते.

**व्यापक कक्षा :**

सुरूवातीला युरोपियन ग्रीक व रोमन पुरातत्वीय अवशेषांबद्दल ओढ असल्याने, पुरातत्वज्ञाला ग्रीक, रोमन व लॅटिन भाषा अवगत असणे अत्यावश्यक समजले जाई. भारतातही भारतीय विद्वानांनी केलेले पुरातत्वीय संशोधन त्यांच्या संस्कृतच्या ज्ञानावर आधारलेले होते. गेल्या अर्धशतकात पुरातत्वीय संशोधन राष्ट्र, धर्म, जात व पंथ यांच्या कक्षा ओलांडून मानवाचा अभ्यास करू लागल्याने मानवसंलग्न सर्व बाबींचा अभ्यास त्यात अंतर्भूत होऊ लागला आहे.[२] मानवी संस्कृती मानवनिर्मित त्याचप्रमाणे नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असल्याने या निरनिराळ्या बाबींचा अभ्यास करणारी सर्व शास्त्रे भूविज्ञान, प्राणिविज्ञान, वनस्पतीशास्त्र हवामानशास्त्र, मानववंशशास्त्र, कालनिश्चिती कार्बन १४, धातुशास्त्र या "शास्त्रीय तंत्राचा अवलंब करणारी कला" असे ओ.जी.एस. क्रॉफर्ड यांनी पुरातत्वविद्येचे यथार्थ वर्णन केले आहे.[३] मानवविद्या व शास्त्रे यांचा अवलंब पुरातत्वविद्येत केला जात असल्याने दोघांचा समन्वय घालून सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत पुरातत्वीय संशोधन लोकांपुढे आले पाहिजे. तंत्रापेक्षा मानव मोठा आहे. त्याने बनविलेल्या वस्तुपेक्षा मानव मोठा असल्याने या मानवाची माहिती व त्यांच्या संस्कृतीची माहिती जाणून घ्यायची इच्छा अलीकडे जास्त प्रकर्षाने जनतेमध्ये निर्माण झाली आहे.

**पुरातत्व संशोधनातील अद्‌भूतता :**

या मानवी इच्छेबरोबरच पुरातत्व व इतर शास्त्र काहीही म्हणोत, या विद्येबद्दल सर्वसामान्यांच्या मनात एक प्रकारचे अद्‌भूततेचे वलय (romanticism) घर करून आहे. हे ना कबूल करून चालणार नाही. सोन्याचा साठा, दागिण्याचा साठा, उत्कृष्ठ मूर्तीचा संग्रह, सांगाडे वगैरे सापडल्यास त्याबद्दल लोकांत अतिशय कुतुहल निर्माण होते व ते सहाजिकच आहे. या अद्‌भूततेच्या पोटी निर्माण झालेले कुतुहल शास्त्रीय परिभाषेची बैठक कायम ठेवूनही, सहज समजू शकेल अशा भाषेत मांडणी करून कसे पुरे करावयाचे हा मुख्य प्रश्न आहे.

**सोपी, सहज भाषा :**

याकरिता पुरातत्ववेत्याने आपली भाषा सर्वसामान्यांना सहज समजेल अशी कमावली पाहिजे. ताम्रनिधी संस्कृती' रंगपूर-२ अ संस्कृती, काळ्या आणि तांबड्या मृदूभांड्यांची संस्कृती अशी तांत्रिक परिभाषा विद्वत्वर्तुळात अर्थवाही असली तरी सर्वसामान्याना त्यापासून बोध होत नाही. त्यामुळे पुरातत्वयी वृत्तान्ताची भाषा-निदान त्याचा सारांश तरी सोपी व सरळ भाषेत करता आल्यास फायदेशीर ठरते. या संस्कृतीचा तांत्रिक तपशीलापेक्षा त्या संस्कृती घडविणारा मानव सर्वसामान्यांना जवळचा वाटतो व तो तसा जास्त वाटावा अशा भाषेत त्या मानवाचे कर्तुत्व पुरातत्वज्ञाने मांडले पाहिजे.

**तांत्रिक परिभाषा व लोकभाषा :**

पुरातत्वीय संशोधनाचा तर लोकांशी निकटचा संबंध आहे. कारण त्यात त्यांच्या पुर्वजांसंबंधी व संस्कृती विषयी माहिती असते. त्यामुळे ही माहिती त्यांना विविध तऱ्हेने उपलब्ध झाली पाहिजे. उत्खनन वा समन्वेषणाचे वृत्तांत कशा तऱ्हेच्या भाषेत लिहिली जावीत. या संदर्भात हे स्पष्ट केले पाहिजे की, वृत्तांत दोन तऱ्हेचे असू शकतात. एक सविस्तर व तज्ञांकरिता लिहिलेला व दूसरा सारांश लोकभाषेत लिहिलेला पहिला विद्वानांकरिता त्याच्या भाषेत तर दुसरा सारांश त्या संशोधनाचा महत्वपूर्ण सारांश लोकांना समजणाऱ्या भाषेत असावा. उत्खननात काही चित्रांसह महत्वपूर्ण माहिती परिपत्रके, माहितीपत्रके स्थानिक भाषेत काढून ती प्रसारित केल्याने पुरातत्वीय संशोधनाबद्दलची लोकांची जिज्ञासा जागृत राहते असा अनुभव आलेला आहे. यामुळे लोकशिक्षण होते एवढेच नव्हे तर या संशोधनाबद्दल आतापर्यंत जे अद्‌भूततेचे वलय होते तेही दूर होऊन या कामाचे शिस्तबध्द शास्त्रीय स्वरूप लोकांच्या मनात ठसण्यास मदत होते.[४]

**प्रदर्शने :**

माहितीपत्र काव्याव्यतिरिक्त उत्खननाच्या ठिकाणी उत्खनित अवशेषज्ञांचे प्रदर्शन, छायाचित्र, रेखाचित्र, माहिती फलक, नमुने यांच्या सहाय्याने भरविल्यास पुरातत्वीय संशोधनाची व्यापकता जनसमुदायाला देता येते. विशेषत: शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांना प्रदर्शनाची माहिती आवर्जून देणे फलदायी ठरते. यामुळे नवीन पिढीला शास्त्रीय ज्ञान व पध्दती यांचे तर होतेच, परंतु स्थानीय व शालेय संग्रहालयाच्या वाढीला हातभार लावण्यासारखे होते. आधुनिक काळात विज्ञानामध्ये निर्माण झालेल्या वैज्ञानिक पध्दतीची मदत घेऊन पुराव्याचे कालमापन या विद्याशाखेद्वारे करण्यात येते मानवजातीच्या इतिहासात लिखित पुराव्याचा कालखंड अलिखित पुराव्याच्या

कालखंडाच्या मानाने फक्त २.५ टक्के आहे.[५]

**वस्तुसंग्रहालये :**

पुरातत्वीय उत्खनन या संबंधी माहिती पत्रके काढून प्रदर्शन भरवून जसे लोकप्रिय करता येते, तसेच वस्तुसंग्रहालयाची वाढ करून वेळोवेळी त्यामध्ये विशिष्ठ विषयाची वा सांस्कृतिक कालाबद्दलची खास प्रदर्शने भरवूनही हा उद्देश साध्य करता येतो. या दृष्टीने भारतातील वस्तुसंग्रहालयांना काम करण्यास मोठा वाव आहे. अशी वस्तुसंग्रहालये अनेक ठिकाणी असावीत का? फक्त मोठ्या शहरात असावीत, या वादात शिरण्याचे कारण नाही. परंतु ज्यावेळी एकाच प्रकारच्या दोन वस्तू असतील त्यावेळी एक स्थानिक वस्तुसंग्रहालयात व एक राष्ट्रीय अथवा इतर ठिकाणच्या संग्रहालयात ठेवल्यास वादास जागा राहत नाही.

**उत्खनित वास्तू :**

पुरातत्वीय उत्खनातील वास्तुरूप पुरावा हलवता येत नाही हे उघड आहे. परंतू त्याचे जतन करून ठिकठिकाणी योग्य माहितीसह फलक लावून त्याचा लोकशिक्षणासाठी उपयोग करणे संयुक्तीक ठरते. गुजरात येथील लोथल, हडप्पा संस्कृतीची गादी उत्तर प्रदेशातील कौशान्बी येथील प्राचीन तटबंदी व श्येनाचितीचे अवशेष, महाराष्ट्रातील पौनी येथील अद्वितीय स्तुप आणि नागरा येथील वाकटककालीन भव्य मंदिर, बिहारमधील नालंदा येथील विहार, आंध्रा प्रदेशातील नागार्जूनकोण्डा येथील बौध्द व इतर वास्तू यांचा त्याचप्रमाणे पाकिस्तानातील मोहोंजोदडो येथील नगरावशेषांचा व इटलीतील पॉम्पे येथील उत्खनित नगरीचा उपयोग प्रवाशांप्रमाणेच लोकशिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर करण्यात यश आले आहे.[६]

**अनेकांची मदत अपरिहार्य :**

अर्थात वृत्तान्ताचे लिखान असो, माहितीपत्रकाचे लेखान असो, स्थानिक प्रदर्शन असो अथवा उत्खनित वास्तू अवशेष असोत, या कामामध्ये अनेक तज्ज्ञांची मदत लागते. पुरातत्वीय संशोधन त्याचप्रमाणे प्रदर्शन हे अनेक तज्ज्ञांच्या सहाय्याने भरवावे लागते. या विविध शास्त्रज्ञ व तंत्रज्ञानाव्यतिरिक्त, स्थानिक भाषेचे व राष्ट्रभाषेचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीची मदत घेणे अपरिहार्य ठरते.

**प्रादेशिक भाषांचा वापर :**

भारतात पुरातत्वविद्या बहुतांशी इंग्रजी भाषेत प्रसिध्द केली जात असे. अजूनही त्यात स्थानिक भाषांचा वाव दिला जात नसल्याने भारतीय पुरातत्वीय संशोधनाची माहिती व्यापक प्रमाणात प्रसारित झालेली नाही. मात्र अलिकडे यात सुधारणा व्हावयास लागली आहे. त्या त्या भागातील वर्तमानपत्रात पुरातत्वीय संशोधनाला व नव्या शोधांची माहिती अलिकडे जास्त प्रमाणात येऊ लागली आहे.[७]

**शाळा व महाविद्यालयाचा सहभाग :**

पुरातत्वीय उत्खननात शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागी करून प्राचीन वस्तुचे महत्व अवगत करून घ्यावे. अवशेष ती त्याच कालखंडातील कशी आणि पुरातत्वज्ञ त्या वास्तुचा कालखंड कसा ठरवितो याबाबतचे प्रत्यक्ष शिक्षण विद्यार्थ्यांना देता येते. इतर शाखेतील वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, मानवंशशास्त्र, कृषीशास्त्र इत्यादी. पुरातत्वीय अवशेषांचे विद्यार्थ्यांना महत्व शिक्षणाद्वारे पटल्यास आज अज्ञानामुळे गावोगावांतील जे पुरावशेष नष्ट होत आहेत ते वाचविण्यास बरीच मदत होऊ शकते.

**व्याख्याने :**

शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत कार्यालयात पुरातत्वज्ञांचे व्याख्याने आयोजित करून पुरातत्वीय अवशेषांबाबत शिक्षण देता येईल. प्रत्येक नागरीकाचे आद्यकर्तव्य कसे आहे, त्याचे सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक किती महत्व आहे याबाबतचे शिक्षण व्याख्यानाद्वारे किंवा प्रत्यक्ष चित्र प्रदर्शनाद्वारे देता येते.[८]

**पुरातत्व आणि सांस्कृतिक एकता :**

मानवी सांस्कृतिक अभ्यासाची व्यापक बैठक मिळाल्याने ही विद्या सांस्कृतिक एकतेचे माध्यम बनण्याची शक्यता ध्यानात घेताना एका गोष्टीची खबरदारी घेणे आवश्यक आहे असा इशारा घ्यावासा वाटतो पुरातत्वीय पुराव्याचा उपयोग केवळ स्वदेशाचे वा स्ववंशाचे मोठेपण अवास्तव स्वरूपात तरूण पिढीवर बिंबविण्याच्या कामी काही देशात केला जात होता व काही युरोपियन आशियाई देशांतही तो तसा

अद्याप होत आहे. सिंधु संस्कृतीचे अवशेष व खजुराहोची मंदिरे सर्व मानवी संस्कृतीच्या संदर्भात पहाणे जरूर आहे. पुरातत्वाचा नवमानवतावादी शिकवण देण्याकडे उपयोग झाल्यास ते सर्वांच्याच फायद्याचे झाल्याशिवाय राहणार नाही.[९]

**निष्कर्ष :**

१) पुरातत्वीय अवशेषांच्या शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना महत्व पटल्यास आज अज्ञानामुळे गावोगावांतील जे पुरावशेष नष्ट होत आहेत ते वाचविण्यास बरीच मदत होऊ शकते.

२) पुरातत्वीय माहितीपत्रके स्थानिक भाषेत काढून ती प्रसारित केल्याने पुरातत्वीय संशोधनाबद्दलची लोकांची जिज्ञासा जागृत राहते.

३) पुरातत्व, प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांचा समन्वय वाढवल्यास जनजागृत होते.

**सारांश :**

आज या शास्त्राला आलेल्या नव्या जाणीवांबरोबरच गेल्या दशकात नवे नवे विचार प्रवाह मूळ धरू लागले आहेत. त्यामुळे पुरातत्वविद्येच्या क्षेत्रात क्रांतीकारी बदल होतील असे वाटू लागले आहे. विसाव्या शतकात तंत्रशुध्द रितीने उत्खनन करून इतर शास्त्राच्या मदतीने मानवी संस्कृतीच्या वाटचालीचा इतिहास उभा करण्यापर्यंत व त्यात राष्ट्र, धर्म, जात यांच्या संकुचित मर्यादा न बाळगता विशाल दृष्टिकोण ठेवण्याइतकी प्रगती झाली हे आपण पाहिलेच. यामुळे मानवी सांस्कृतिक इतिहासाचे वर्णनात्मक विवेचन तपशिलासह पुरातत्वीय लेखनात आढळून येण्याइतका विकास झाला आहे हे खरे. परंतु या नवपुरातत्व समर्थकांचे म्हणणे असे की, मानवी संस्कृतिच्या विकासातील टप्पे यथार्थपणे वर्णन करणे एवढेच काम विसाव्या शतकातील पुरातत्वज्ञांनी केले आहे. ते अपुरे आहे. नव्या विचारसरणीच्या पुरातत्वज्ञांनी यापुढे गेले पाहिजे. पुरातत्वाच्या शिक्षणामुळे सर्व सामान्यांना आपला इतिहास व संस्कृतिविषयी आकलन घेण्यास मदत होते.

**संदर्भसूची :**

१) डॉ. ओझा श्रीकृष्ण, भारतीय पुरातत्व, रिसर्च पब्लिकेशन, जयपूर, पृ.क्र. १७

२) डॉ. सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा., भारतीय पुरातत्वशास्त्र (तत्व आणि पध्दती), निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, जुलै २००४, पृ.क्र. २३५

३) डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २ ऑक्टोंबर २००५, पृ.क्र. २९

४) देव शांताराम भालचंद्र, पुरातत्व विद्या, कॅन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००८, पृ.क्र. १५४

५) डॉ. सरदेसाई बी.एन., इतिहास लेखन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, जानेवारी- २००५, पृ.क्र. ५३

६) डॉ. सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा. (उपरोक्त) पृ.क्र. २३७

७) देव शांताराम भालचंद्र (उपरोक्त) पृ.क्र. १५५

८) डॉ सावंत उत्तम, डॉ. बोरकर र.रा., (उपरोक्त) पृ.क्र. २३८

९) देव शांताराम भालचंद (उपरोक्त) पृ.क्र. १५६